# कार्यकारी सारांश

# कार्यकारी सारांश

भारत सरकारने सप्टेंबर 2005 मध्ये राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम, 2005 अधिसूचित केला होता, ज्याला नंतर 2009 मध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम असे नाव देण्यात आले. या अधिनियमाचा उद्देश ग्रामीण भागातील लोकांची उपजीविका सुधारण्याचा असून प्रत्येक ग्रामीण कुटुंबाला, ज्यांचे प्रौढ सदस्य स्वयंस्फूर्तीने अकुशल अंगमेहनतीचे काम करण्यास इच्छुक आहेत त्यांना एका आर्थिक वर्षात किमान 100 दिवसांच्या मजुरीची हमी देणारे रोजगार उपलब्ध करून देणे हा आहे.

ग्रामीण भागात अकुशल अंगमेहनतीचे काम करण्यासाठी इच्छुक असलेल्या सर्व प्रौढ व्यक्तींना रोजगाराची हमी देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्रात रोजगार हमी अधिनियम, 1977 मध्ये लागू करण्यात आला.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमाच्या कलम 28 नुसार महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम,1977 वेळोवेळी सुधारित करून तो, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमाच्या तरतुदींशी सुसंगत केला. महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियमांतर्गत तयार करण्यात आलेल्या रोजगार हमी योजनेचे (जानेवारी 1979) नाव बदलून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना असे पुनर्नामित (जुलै 2011) करण्यात आले.

नियोजन प्रक्रिया आणि वित्तीय व्यवस्थापन पद्धतींच्या पर्याप्ततेचा आढावा घेणे, रोजगार निर्मिती, टिकाऊ आणि उपयुक्त मालमत्तेची निर्मिती आणि देखभाल करणे तसेच इतर कार्यक्रम/योजनांशी अभिसरण सुनिश्चित करणे हे संपादणूक लेखापरीक्षणाचे उद्दिष्ट होते. संपादणूक लेखापरीक्षणात संनियंत्रण, सामाजिक अंकेक्षण आणि तक्रार निवारण प्रणालीच्या पर्याप्ततेचे देखील मूल्यांकन केले गेले. लेखापरीक्षणाने 2019-20 ते 2023-24 या वर्षांसाठी अहिल्यानगर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, नागपूर आणि पालघर या सहा जिल्ह्यांचे आणि 12 तालुके (प्रत्येक जिल्ह्यातील दोन तालुके) आणि 48 ग्राम पंचायती (प्रत्येक तालुक्यामधून चार ग्राम पंचायतीं) यांचे अभिलेख तपासले.

महाराष्ट्रातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेवरील संपादणूक लेखापरीक्षणाची निष्पत्ती ज्यात महत्त्वाचे निष्कर्ष आणि शिफारशी यांचा समावेश आहे, ते खालील परिच्छेदांमध्ये थोडक्यात नमूद केले आहेत.

**नियोजन आणि वित्तीय व्यवस्थापन**

वार्षिक कृती आराखडा आणि मजूर अर्थसंकल्प सादर करण्यास विलंब झाला. वार्षिक कृती आराखडा आणि मजूर अर्थसंकल्पात कामाच्या मागणीचे प्रमाण आणि वेळेचा तपशील समाविष्ट नव्हता. ग्राम पंचायतीमधील रोजगाराची मागणी किती प्रमाणात आहे

आणि किती काळ आहे याचे मूल्यमापन करण्यासाठी पायाभूत सर्वेक्षण दर पाच वर्षातून एकदा करणे आवश्यक होते. महाराष्ट्र शासनाने कोणतेही पायाभूत सर्वेक्षण केले नव्हते.

राज्यातील 28,279 ग्राम पंचायतींपैकी 2,258 ग्राम पंचायतींमध्ये ग्राम पंचायत स्तरावर कामे राबविण्यासाठी ग्राम रोजगार सहाय्यक नियुक्त करण्यात आले नव्हते. कार्यचालन मार्गदर्शक तत्त्वांनुसार, कामगारांच्या उपस्थितीसह कामाच्या ठिकाणी सुविधा व्यवस्थापित करण्यात ग्राम रोजगार सहाय्यकाला मदत करण्यासाठी प्रत्येक कामासाठी एक सहकारी नियुक्त करणे आवश्यक होते. निवडलेल्या 48 ग्रामपंचायतीपैकी, 2021-22 ते 2023-24 या कालावधीत 26 ग्राम पंचायतींमध्ये सहकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली नव्हती.

2019-20 ते 2023-24 या कालावधीत प्राप्त झालेल्या एकूण ₹ 13,957.47 कोटी (आरंभीची शिल्लक धरून) निधीपैकी योजनेवर ₹ 13,518.30 कोटी खर्च झाला. 2022-23 आणि 2023-24 या कालावधीत जारी करण्यात आलेल्या ₹ 926.51 कोटींपैकी राज्याचा हिस्सा ₹ 415.73 कोटी (45 टक्के) चार दिवस ते 242 दिवसांच्या विलंबाने जारी करण्यात आला.

**कामगारांची नोंदणी आणि मजुरीचे प्रदान**

2019-20 ते 2023-24 या कालावधीत या योजनेंतर्गत नोंदणीकृत कुटुंबांच्या संख्येत 46 टक्क्यांनी वाढ झाली आहे. 117.98 लाख (सरासरी) नोंदणीकृत कुटुंबांपैकी केवळ 21.97 लाख (19 टक्के) कुटुंबांनी रोजगाराची मागणी केली. 2019-20 ते 2023-24 या कालावधीत रोजगाराची मागणी करणाऱ्या 21.97 लाख कुटुंबांपैकी 21.91 लाख (99.73 टक्के) कुटुंबांना रोजगार देण्यात आला. तथापि, 2019-20 ते 2023-24 या कालावधीत रोजगाराचा लाभ घेतलेल्या 19.65 लाख कुटुंबांपैकी (पाच वर्षांची सरासरी) केवळ 1.71 लाख कुटुंबांनी (8.70 टक्के) 100 दिवस किंवा त्याहून अधिक कालावधीच्या रोजगाराचा लाभ घेतला. या योजनेंतर्गत घरोघरी सर्वेक्षण करण्यासाठी चाचणी-तपासणी केलेल्या 48 ग्राम पंचायतींपैकी 22 (46 टक्के) ग्राम पंचायतीत घरोघरी जाऊन सर्वेक्षण केले गेले नाही. निवडलेल्या 48 पैकी 47 ग्राम पंचायतींमध्ये जॉब कार्डससाठी अर्ज पाठविल्याची तारीख, जारी केलेल्या जॉब कार्डसचा तपशील दर्शविणारी अर्ज नोंदवही ठेवली गेली/अद्ययावत केली गेली नाही. जॉब कार्डसच्या देखभालीतील त्रुटी जसे की नोंदणीकृत सदस्यांचे फोटो नसणे, कामाच्या मागणीचा तपशील न नोंदवणे इ. लेखापरीक्षणात निदर्शनास आल्या.

2019-20 ते 2023-24 या कालावधीत 48 निवडलेल्या ग्राम पंचायतींमधील 15,077 नोंदणीकृत कुटुंबांपैकी, जानेवारी 2025 पर्यंत 13,728 (91 टक्के) नोंदणीकृत कुटुंबांना जॉब कार्डस देण्यात आली. तसेच, 2019-20 ते 2023-24 या कालावधीत निवडलेल्या ग्राम पंचायतींमध्ये 7,771 जॉब कार्डस (52 टक्के) जारी करण्यास विलंब झाला. निवडलेल्या 48 ग्राम पंचायतींपैकी 44 ग्राम पंचायतींमध्ये 577 जॉब कार्डसवर घरच्या प्रमुखाचे नाव होते ज्यासाठी जॉब कार्डस आधीच जारी करण्यात आली होती. नरेगासॉफ्ट

या वेब-सक्षम अनुप्रयोगात घरच्या प्रमुखाच्या समान नावाच्या जॉब कार्डसची नोंदणी रोखण्यासाठी काहीही नियंत्रण नव्हते.

2019-20 ते 2023-24 या कालावधीत रोजगार उपलब्ध करून देण्याच्या असमर्थतेबद्दल नरेगासॉफ्टने गणना केलेल्या एकूण ₹ 34.85 लाख बेरोजगारी भत्त्यापैकी केवळ ₹ 2,268 देण्यात आले. राज्य स्तरावर आणि सहा निवडक जिल्ह्यांमध्ये या योजनेंतर्गत रोजगारात महिलांचे प्रतिनिधित्व एकूण रोजगार निर्मितीच्या एक तृतीयांश पेक्षा जास्त होते. निवडलेल्या 48 ग्राम पंचायतींपैकी 21 ग्राम पंचायतींमध्ये, 2019-20 ते 2023-24 या कालावधीत दिव्यांग व्यक्ती आणि इतर असुरक्षित व्यक्तींचा शोध घेण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात आली.

महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियमात नमूद केल्याप्रमाणे महिला, वृद्ध, अपंग आणि दुर्धर आजार असलेल्या लोकांसाठी स्वतंत्र दर सूची राज्य शासनाने तयार केली नव्हती.

2019-20 ते 2023-24 या कालावधीत मजुरी देण्यास सरासरी सात टक्के विलंब झाला. नैसर्गिक आपत्ती आणि नुकसान भरपाई देय नसल्यामुळे मजुरी देण्यास विलंब झाल्याबद्दल कामगारांना ₹ 5.88 कोटी नुकसान भरपाई संयुक्त कार्यक्रम अधिकाऱ्यांनी नाकारली, जरी अशा नकारासाठी महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियमांतर्गत कोणतीही तरतूद नव्हती. विलंबाने देण्यात आलेल्या मजुरीवर देय नुकसान भरपाई देण्यास ही विलंब झाल्यास त्यावर ही नुकसान भरपाई देय होती. तथापि, अशा भरपाईची गणना करण्याची तरतूद नरेगासॉफ्टमध्ये नव्हती किंवा अशी भरपाई देण्यास विलंब झाल्यास राज्य शासनाने देय भरपाईची गणना केली नाही.

2019-20 ते 2023-24 या कालावधीच्या अकुशल कामगारांच्या ₹ 35.32 कोटी देय मजुरीचे प्रदान प्रलंबित होते (ऑक्टोबर 2024). सप्टेंबर 2025 पर्यंत राज्यातील 99.33 टक्के सक्रिय कामगारांचे आधार क्रमांक नोंदून घेण्याचे कार्य पूर्ण झाले होते, तर नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने आधार आधारित देयके देण्यासाठी 96.43 टक्के सक्रिय कामगारांचे नकाशन पूर्ण केले होते. निवडलेल्या 48 ग्राम पंचायतींमध्ये प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत कामे पूर्ण झाल्याच्या तारखेनंतरही हजेरीपटांची निर्मिती आणि कामगारांना ₹ 51.82 लाख दिले गेल्याचे अभिसरण कामांच्या लेखापरीक्षणातून दिसून आले.

**कामांची अंमलबजावणी**

राज्यात 2019-20 ते 2023-24 दरम्यान मंजूर झालेल्या 25.72 लाख कामांपैकी 5.03 लाख कामे (19.57 टक्के) अपूर्ण होती, तर 7.10 लाख (27.62 टक्के) कामे सुरू झाली नव्हती. याव्यतिरिक्त, 2019-20 पूर्वीच्या कालावधीशी संबंधित 3.03 लाख कामे अपूर्ण होती. ग्राम पंचायतींमध्ये एकावेळी किती कामे हाती घेता येतील याची मर्यादा राज्य शासनाने निश्चित केलेली नव्हती.

336 कामांच्या प्रत्यक्ष तपासणी दरम्यान, लेखापरीक्षणाच्या निदर्शनास आले की 219 कामाच्या ठिकाणी (65 टक्के) कामांची माहिती असलेले दर्शक फलक उपलब्ध नव्हते.

ऑगस्ट 2024 पर्यंत 30 टक्के कामांचे भौगोलिक चिन्हांकन प्रलंबित होते. 2019-20 ते 2023-24 दरम्यान कुशल वेतन, साहित्य खर्च आणि कर यांचे प्रलंबित दायित्व ₹ 541.92 कोटी (ऑक्टोबर 2024) होते.

**देखरेख, सामाजिक अंकेक्षण आणि तक्रार निवारण**

अधिनियम व योजनेच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवण्यासाठी महाराष्ट्र राज्य रोजगार हमी परिषदेची स्थापना करण्यात आली होती. मात्र, परिषदेच्या नियमित बैठका झाल्या नाहीत. कामांच्या गुणवत्तेच्या देखरेखीसाठी राज्य स्तरावर राज्य गुणवत्ता देखरेख संचालकांची नियुक्ती करण्यात आली होती, मात्र प्रत्येक जिल्ह्यासाठी राज्य गुणवत्ता निरीक्षक यांची नियुक्ती करण्यात आली नव्हती. 2019-20 ते 2023-24 दरम्यान ग्राम पंचायतींच्या एकूण संख्येसंदर्भात सामाजिक अंकेक्षण करण्यातील तूट 72.43 टक्के ते 95.67 टक्के दरम्यान होती. 2019-20 ते 2023-24 या कालावधीत सामाजिक अंकेक्षण पथकाने निदर्शनास आणून दिलेल्या 1,084 गैरव्यवहार प्रकरणांमध्ये वसूल करावयाच्या ₹11.22 कोटींपैकी, 314 प्रकरणांमध्ये ₹ 4.44 कोटी वसूल करण्याची कारवाई प्रलंबित होती. उपजीविकेची सुरक्षा, उत्पन्नाची पातळी वाढविण्यावर या योजनेच्या प्रभावाचे मूल्यांकन करण्यासाठी राज्य शासनाकडून मूल्यांकन अभ्यास केला गेला नाही.

**शिफारशी :**

- ***शासनाने वार्षिक कृती आराखडा आणि मजूर अर्थसंकल्पात समाविष्ट केल्या जाणाऱ्या कामांच्या मागणीचे प्रमाण आणि वेळेचे निर्धारण सुनिश्चित करण्याकरिता पायाभूत सर्वेक्षण करण्यासाठी योग्य ती कार्यवाही करावी.***
- ***शासनाने प्रारंभापासून अंमलबजावणी आणि देखरेख क्षमता मजबूत करण्यासाठी सर्व ग्राम पंचायतींमध्ये ग्राम रोजगार सहाय्यक नियुक्त करण्यासाठी कार्यवाही करावी.***
- ***शासनाने महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियमात नमूद केलेल्या विहित कालावधीत जॉबकार्डस देण्याचे निर्देश सर्व ग्राम पंचायतींना द्यावे तसेच नोंदणीकृत दुबार जॉबकार्डस वगळण्यासाठी त्वरित कार्यवाही करावी.***
- ***शासनाने महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियमातील तरतुदींनुसार बेरोजगारी भत्ता व मजुरी देण्यास विलंब झाल्यास नुकसान भरपाई देण्याची सुनिश्चिती करावी.***
- ***शासनाने संनियंत्रण बळकट करावे आणि प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत कामांच्या पूर्ण होण्याच्या तारखेनंतर हजेरीपट तयार करणे रोखण्यासाठी योग्य यंत्रणा तयार करावी.***
- ***शासनाने ग्राम पंचायतीत नवीन कामे मंजूर करण्यासाठी विहित तरतुदींचे पालन करण्याचे निर्देश द्यावेत.***
- ***शासनाने सर्व जिल्ह्यांमध्ये राज्य गुणवत्ता नियंत्रकांची नियुक्ती जलद गतीने करावी.***

- ***शासनाने विहित निकषांनुसार सामाजिक अंकेक्षण करावे आणि महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियमातील तरतुदींनुसार सामाजिक अंकेक्षण कार्यालयाने निदर्शनास आणून दिलेल्या आर्थिक गैरव्यवहाराची वसुली जलद गतीने करावी.***